# व्यवसाय अभ्यासक्रमांची निवड भाग २

**प्रा. दीपक ताटपुजे, सातारा.**

उपलब्ध मनुष्यबळाचा वापर योग्य पध्दतीने होण्यासाठी विद्यार्थी-पालकांना विविध चाकोऱ्याबाहेरील शैक्षणिक अभ्यासक्रम, स्वयंरोजगाराच्या उपलब्ध संधी आदीची माहिती होणे आवश्यक आहे. त्याचबरोबरीने प्रवेशासाठीच्या नियमांची माहिती आय.टी.आयचे अभ्यासक्रम, महिलांसाठीचे कौशल्यवृध्दी करणारे विविध अभ्यासक्रम व त्यांचे प्रवेश नियम आदींची माहिती विद्यार्थी पालकांना महत्वाची आहे.

## *प्रवेश नियम माहिती*

इयत्ता दहावीनंतर अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय क्षेत्रांची स्वप्ने पाहणारे विद्यार्थी शास्त्र शाखेकडे प्रवेश घेतात. अभियांत्रिकी शाखेकडे वळणारे विद्यार्थी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पी.सी.एम.) या विषयांचा अभ्यास निवडताना आढळतात. इयत्ता बारावीमध्ये कमी गुण मिळाल्यानंतर मात्र विद्यार्थी पदविका (डिप्लोमा) अभियांत्रिकीकडे वळण्याचा विचार करतात. त्यांना पुन्हा इयत्ता दहावीच्या गुणावर प्रथम वर्षाला प्रवेश घ्यावा लागतो. पर्यायाने विद्यार्थ्याचे दोन वर्षांचे नुकसान होते. इयत्ता बारावी शास्त्र शाखेचे विद्यार्थी द्विलक्षी व्यावसायिक अभ्यासक्रमाचे (इलेक्ट्रिकल मेंटेनन्स, मेकॅनिकल मेंटेनन्स इत्यादी) विषय अकरावी आणि बारावीलर घेतले असतील तरच व्दितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. या नियमाची माहिती पालकांना असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे पालक विषय निवडीचा निर्णय दहावीच्या निकालावर घेऊ शकतात. किमान कौशल्यावरील अभ्यासक्रम, आय.टी.आय. अभ्यासक्रमांनंतर डिप्लोमाच्या व्दितीय वर्षासाठी विद्यार्थी पात्र आहेत मात्र त्यांना त्या अभ्यासक्रमांना किमान ६०%हून अधिक गुणांची आवश्यकता असते.

## *आय.टी.आय अभ्यासक्रम*

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत येणाऱ्या योजनांमध्ये शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना ही एक अतिशय महत्वाची योजना असून या योजनेअंतर्गत राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतून (आय.टी.आय.) निरनिराळ्या अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी व्यवसायांतून प्रशिक्षण देऊन त्या त्या व्यवसायातून कारागीर तयार करण्याची जबाबदारी शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेवर टाकण्यात आली आहे.

या आय.टी.आय. अभ्यासक्रमांमध्ये प्रामुख्याने सांधाता, साचेकार, डिझेल यांत्रिकी, नळ कारागीर, टूल ॲन्ड डायमेकर, रेडिओ आणि चित्रवाणी यांत्रिकी, डाटा प्रिपरेशन ॲन्ड सॉफ्टवेअर असिस्टंट, तारयंत्री, यंत्र कारागीर, जोडारी, कातारी, आरेखक, रंगारी सुतार आदी ३९ अभियांत्रिकी (तांत्रिक) अभ्यासक्रमांबरोबरच इंग्रजी लघुलेखन, कर्तन व शिवणशास्त्र, एम्ब्रायडरी, ड्रेस मेकिंग, सेक्रेटरी प्रॅक्टिस, फळे भाज्या टिकवणे, ब्लिचिंग डायिंग आदी अनेक अतांत्रिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

प्रवेशासाठी किमान शैक्षणिक अर्हता ही त्या त्या व्यवसायाच्या अभ्यासक्रमाला अनुसरून ठरविण्यात आलेली असून काही व्यवसायांसाठी ती शालांत परीक्षा अनुत्तीर्ण अशी असून काही व्यवसायांसाठी शालांत परीक्षा उत्तीर्ण व

इयत्ता १२ वी उत्तीर्ण अशी आहे. सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतून प्रवेश घेण्यासाठी प्रवेश नियमावली बनविण्यात आलेली आहे. त्यानुसार हे प्रवेश गुणवत्तेला अनुसरून दिले जातात.

## *प्रशिक्षण*

प्रात्यक्षिकावर आधारित असे काम कारखान्यातून करत असतानाच त्यांना अनुषंगिक पुस्तकी ज्ञान देण्याची सोय मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रातून (बी.टी.ॲन्ड आर. आय. सेंटर्स) मधून केली जाते आणि त्यानंतर त्यांची परीक्षा घेऊन विद्यार्थी कुशल कामगार बनतो. त्यामुळे अनेक नोकरीच्या संधी उपलब्ध होतात.

## *आय. टी. आय. अभ्यासक्रम निवड*

विशेष अभ्यासक्रमांची निवड करत असताना टूल ॲन्ड डायमेकर, रेफ्रिजरेशन ॲन्ड एअरकंडिशन मेकॅनिक, रेडिओ ॲन्ड टी.व्ही. मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक, मशिनिस्ट, मिलराईट मेटेनन्स, टर्नर आदी अभ्यासक्रमांसाठी प्रवेशासाठी प्राधान्याने विचार करावा. हे अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर औद्योगिक कंपन्यांमधून नोकरीच्या उपलब्ध संधीबरोबरच स्वतःचा स्वयंरोजगार काढू शकतात. उज्ज्वल भवितव्यासाठी या क्षेत्रातील स्वयंरोजगार मोठ्या कारखान्यांचे पूरक-उद्योग म्हणून ही महत्वाची कामगिरी बजावत आहेत.

शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेत समाविष्ट केलेले प्रशिक्षण देण्याकरिता देशात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून शिकविण्यासाठी ३९ अभियांत्रिकी व २७ बिगर अभियांत्रिकी अशा एकूण ६६ व्यवसायांचे अभ्यासकेंद्र शासनातर्फे तयार करण्यात आलेले असून महाराष्ट्रातील संस्थांतून त्यापैकी ३५ अभियांत्रिकी व १३ बिगर अभियांत्रिकी अशा एकूण ४८ व्यवसायांतून प्रशिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

## *महिलांसाठी अभ्यासक्रम*

महिलांसाठी दहावीनंतर ड्रेस मेकिंग (१ वर्ष), यंत्र विणकाम (१ वर्ष), ब्लिचिंग डाईंग ॲन्ड कॅलिको प्रिटींग (१वर्ष), सेक्रेटरी प्रॅक्टिस (१वर्ष), प्रिझरवेशन ऑफ फ्रूटस ॲन्ड व्हेजिटेबल, ब्युटिशियन, स्टेनोग्राफी आदी अभ्यासक्रम उपलब्ध असून स्त्रियांसाठी खास प्रशिक्षण संस्थाही आहेत.

दैनंदिन जीवनाच्या अत्यावश्यक भाग असणाऱ्या या क्षेत्रात विद्युत उपकरणांची दुरूस्ती, मोटर दुरूस्ती, घरगुती तसेच औद्योगिक क्षेत्रासाठी वायरींग आदी क्षेत्रामध्येही स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध असून अत्यंत कमी भांडवलामध्ये हे व्यवसाय सुरू करणे शक्य आहे.

शालांत परीक्षेनंतर एक अथवा दोन वर्षे मुदतीच्या अभ्यासक्रमांमध्ये प्लास्टिक प्रोसेसिंग ऑपरेटर, प्लास्टिक मोल्ड मेकर, रबर टेक्निशियन हे अभ्यासक्रम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबरनाथ आणि आय.टी.आय. औंध, पुणे येथे चालविले जातात. त्याचप्रमाणे इन्स्ट्रूमेंट मेकॅनिक (उपकरण यांत्रिकी) हा दोन वर्षाचा अभ्यास अनेक संस्थांमधून चालवण्यात येतो.